## पूर्व मान्यतेसाठी

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स एसएमएस एन्व्होक्लीन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या गट नं. २३१, गाव-आत्करगांव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन सामाईक जैव वैदकीय प्रक्रिया केंद्र (CBMWTSDF) सह रोटरी भट्टी इन्सिनरेटर (2,000 kg/hr X २ नंबर्स), ऑटोक्लेव्ह (५०० kg/hr x ८ नंबर्स), श्रेडर (५०० kg/hr x ८ नंबर्स), केमिकल डिसइन्फेशन युनिट (१००० kg/hr X २ नंबर्स) आणि प्लास्टिक दाना रिसायक्लेर युनिट (१०० kg/hr x ६ नंबर्स) प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक दि. १७.११.२०२१ रोजीच्या जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स एसएमएस एन्व्होक्लीन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या गट नं. २३१, गाव-आत्करगाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन सामाईक जैव वैदकीय प्रक्रिया कैंद्र (CBMWTSDF) सह रोटरी भट्टी इन्सिनरेटर (२,००० kg/hr X २ नंबर्स), ऑटोक्लेव्ह (५०० kg/hr x ८ नंबर्स), श्रेडर (५०० kg/hr x ८ नंबर्स), केमिकल डिसइन्फेशन युनिट (१००० kg/hr X २ नंबर्स) आणि प्लास्टिक दाना रिसायक्लेर युनिट (१०० kg/hr x ६ नंबर्स) प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता सॅम्युअल हॉल, ४ था मजला, जुना मुंबई-पुणे हायवे (एन.एच.४), खोपोली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड - ४१० २०३ येथे आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती स्थानापन्न झाल्यानंतर उपस्थितांपैकी ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी व विविध संघटना हातात बॅनर घेऊन प्रकल्पाच्या विरुध्द सतत घोषणा देत होते.

श्री विद्यासागर किल्लेदार, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड-१ समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. पद्मश्री बैनाडे, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती आणि प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, स्थानिक शेतकरी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणीची प्रक्रिया सुरु केली.

समन्वयक, यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त १५० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. सदस्य, आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स एसएमएस एन्व्होक्लीन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या गट नं. २३१, गाव-आत्करगाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन सामाईक जैव

वैदकीय प्रक्रिया केंद्र (CBMWTSDF) सह रोटरी भट्टी इन्सिनरेटर (२,००० kg/hr X २ नंबर्स), ऑटोक्लेव्ह (५०० kg/hr x ८ नंबर्स), श्रेडर (५०० kg/hr x ८ नंबर्स), केमिकल डिसइन्फेशन युनिट (१००० kg/hr X २ नंबर्स) आणि प्लास्टिक दाना रिसायक्लेर युनिट (१०० kg/hr x ६ नंबर्स) प्रकल्प उभारणीस पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन राज्य प्रभाव आकलन प्राधिकरण (State Environment Impact Assessment Authority-SEIAA) च्या २१७ व्या बैठकीत आणि राज्य तज्ज्ञ मुल्यांकन समिती (SEAC-I) यांनी १९४ व्या बैठकीत Terms of Reference (ToR) मंजूर करण्यात आला. (ToR) मंजूरीचे पत्र दिनांक २३ मार्च २०२१ रोजी प्राप्त झाले.

त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी मसुदा/ड्राफ्ट पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन भारत सरकारच्या पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार दिनांक १६.०६.२०२१ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज सादर केला.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू प्रस्तावित प्रकल्पाबाबतची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी दिनांक १३-०८-२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. तथापि, मा. जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, रायगड, अलिबाग यांच्या दिनांक ०६-०८-२०२१ रोजीच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यात उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीजन्य परिस्थितीमुळे सदरील जनसुनावणी पुढे ढकलण्यात आली होती.

तदनंतर मा. जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, रायगड, अलिबाग यांच्या दिनांक ११-१०-२०२१ रोजीच्या आदेशानुसार दि.

१७.११.२०२१ रोजी दुपारी १२:३० वाजता सॅम्युअल हॉल, पहिला मजला, जूना मुंबई पूणे हायवे (एन एच 4), खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड- 410203 या नमूद ठिकाणी घेण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई- १००/२०२१, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१११०३-एफटीएस-००९९, दिनांक ०३-११-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

**२)** प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१ - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड

सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक विभाग क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये - **श्रेणी ब मध्ये** ७ (डीए) मोडत आहे.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, रायगड यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक कृषिवल यात मराठीत दिनांक १६.१०.२०२१, स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत दिनांक १६.१०.२०२१ व राष्ट्रीय वृत्तपत्र यात इंग्रजीत दिनांक १६.१०.२०२१ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय - पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय - रायगड, अलिबाग, मा. अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - रायगड, अलिबाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - रायगड, अलिबाग, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - रायगड, अलिबाग, तहसीलदार, तहसील कार्यालय-खालापूर, जिल्हा - रायगड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तालुका-खालापूर, जिल्हा - रायगड, मुख्याधिकारी,

खोपोली नगरपालिका, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड, मुख्याधिकारी, खालापूर नगरपंचायत, तालुका-खालापूर, जिल्हा - रायगड, **<u>ग्रामपंचायत, कार्यालये</u>** - ग्रुप ग्रामपंचायत -होनाड, ग्रुप ग्रामपंचायत-आत्करगांव, ग्रुप ग्रामपंचायत-ठाणेन्हावे, ग्रुप ग्रामपंचायत-साजगाव, ग्रुप ग्रामपंचायत-देवन्हावे, ग्रुप ग्रामपंचायत -उंब्रे, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय-खानाव,ग्रामपंचायत कार्यालय-ताकई, ग्रामपंचायत कार्यालय-वडवळ,ग्रामपंचायत कार्यालय-चावणी, ग्रामपंचायत कार्यालय-खारीवली, ग्रामपंचायत कार्यालय-हळखुर्द, ग्रामपंचायत कार्यालय-सावरोली, ग्रामपंचायत कार्यालय-महड, ग्रामपंचायत कार्यालय-कुरवंडे, ग्रामपंचायत कार्यालय-खारंबेली,
संचालक, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय - मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुंबई, प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - रायगड, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई व मप्रनि मंडळाच्या संकतेस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

समन्वयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना लेखी वा तोंडी स्वरुपात असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि सादरीकरणानंतर देण्यात येईल असे सांगितले. तसेच सादरीकरणानंतर लेखी सूचना / निवेदन आक्षेप हरकती द्यावच्या असल्यास त्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीकडे देण्यात याव्यात व त्या अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सादर करता येतील. ज्यांना तोंडी प्रश्न विचारायचे असतील, त्यांनी

सादरीकरणानंतर आपले नांव व गाव स्पष्टपणे सांगून मांडावेत. प्रकल्प प्रवर्तक किंवा पर्यावरण सल्लागार त्या प्रश्नांची उत्तरे देतील. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात येऊन ते म.प्र.नि.मंडळाच्या मुख्यालयात भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास सादर करण्यासाठी पाठविण्यात येईल असे सांगितले. तसेच ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास सादर करावयाचा असतो असे सांगितले. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते असे सांगितले. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

यावेळी सभागृहातील काही लोक प्रकल्पाच्या विरुध्द घोषणा देत होते. अध्यक्षा , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वांना त्यांच्या सूचना, आक्षेप नोंदविण्याची संधि देण्यात येणार असून सर्वांनी सादरीकरण शांततेने ऐकण्याचे आवाहन केले.

सादरीकरण सुरु केल्यानंतर परत एक समुह निषेधाच्या घोषणा देत होता. त्यावेळी, खालापूर तालुक्याचे तहसीलदार श्री. आयुब तांबोळी यांनी घोषणा देणा-या उपस्थित लोकांना सांगितले की आपल्या भावना, मते जाणून घेण्यासाठीच ही बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.. सादरीकरणानंतर प्रत्येक व्यक्तीस बोलण्याची संधि देण्यात येईल. आपण उपस्थित करण्यात आलेली सूचना, आक्षेप यांची नोंद जशीच्या तशी घेण्यात येऊन त्याचा इतिवृतान्तात समावेश करण्यात येणार

आहे. तरी कृपया सादरीकरण पुर्ण करुन द्यावे. गोंधळामुळे आपले म्हणणे आम्हाला योग्य पध्दतीने शासनास सादर करण्यात अडचणीचे होत आहे. ही बैठक आपली प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठीच आयोजित करण्यात आलेली आहे. तदनंतर प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पाविषयी सविस्तर सादरीकरण केले.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की आपले जे म्हणणे आहे ते आपले जे प्रतिनिधी असतील त्यांना देण्यात यावेत. त्यांनी प्रतिनिधींची नांवे देण्यास सांगितली. त्याचप्रमाणे ज्यांना बोलायचे आहे त्यांनी हात वर करावेत अशी सूचना केली.

श्री संदीप पाटील यांनी सांगितले की त्यांनी खालापूरचे आमदार श्री महेंद्र थोरवे आणि श्री नरेश पाटील, सदस्य, जिल्हा परिषद यांचे प्रकल्पास विरोध दर्शवणारे पत्र आणलेले असून ते शासनास पाठविण्यासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सादर करत आहे. त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदरहू पत्र बैठकीत वाचून दाखविण्याची सूचना केली.

**<u>खालील उपस्थितांनी चर्चेत भाग घेतला -</u>**

१) **<u>श्री रघुनाथभाई शिंदे, माजी उपाध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद, जिल्हा-रायगडः-</u>**

येथे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड यांनी ही जनसुनावणी प्रस्तावित एसएमएस कंपनीचा जैविक कच-यावर प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्यासाठी आयोजित करण्यात

आलेली आहे. आत्करगावातील सरपंच, उपसरपंच व त्याचप्रमाणे या परिसरातील बहुतांशी सरपंच, उपसरपंच यांनी या प्रकल्पास विरोध केलेला असून तशा प्रकारचा पत्रव्यवहार शासनाबरोबर केलेला आहे. तरी माझी प्रशासनाला विनंती आहे की या प्रकल्पाचा घाट घेत असताना या परिसरात जे स्थानिक लोक आहेत, परिसरात आदिवासी, दलित बांधव राहतात, येथे सर्व जाती धर्मातील लोक येथे गुण्यागोविंदाने नांदत आहेत. येथे शासन हा प्रकल्प जबरदस्तीने लादू इच्छितो आहे. त्याचा ग्रामस्थ म्हणून मी निषेध करतो. या प्रकल्पामुळे होणारे दुष्परिणाम व उपायोजना याबाबत कंपनीतर्फे आम्हांला सादरीकरण दाखविण्यात आलेले आहे, त्यामुळे स्थानिकांचे समाधान झालेले दिसत नाही. तरी माझी विनंती आहे की ज्या लोकभावना आहेत, लोकांच्या भावनांचा आदर करणे हे प्रशासनाला बंधनकारक आहे. संविधानाने आंम्हाला अधिकार दिलेले आहेत. जर येथील स्थानिकांना हा कारखाना नको असेल, तर कुठलीही दडपशाही न करता हा कारखाना रद्द करावा लागेल. येथील स्थानिकांनी लोकप्रतिनिधिंना निवेदन सादर केलेले आहे. परिसरातील सर्व लोकप्रतिनिधींनी प्रकल्प रद्द करण्याची मागणी केलेली आहे. तरी सर्व ग्रामस्थांतर्फे प्रशासनास आणि प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती करण्यात येते की ह्या प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये.

हा छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र असून प्रशासनाने दडपशाहीने हा प्रकल्प आणण्याचा प्रयत्न् करु नये. या प्रकल्पामुळे परिसरातील प्रदूषणात वाढ होईल असेच येथील

ग्रामस्थांना वाटते. याठिकाणी ग्रामस्थ आपल्या भावना पोटतिडकीने मांडत आहेत. तर प्रशासनाने काय प्रयत्न केले, तर पोलिस दलाचा दडपशाहीने वापर करण्याचा प्रयत्न केला. जर पोलिसांकडून दडपशाही करण्यात आली, तर आज पंचक्रोशीतील लोक आहेत, उद्या संपूर्ण तालुक्यातील लोक येतील आणि यास विरोध करतील.

जर येथे पोलिस दलाचा वापर करण्यात आला, तर त्यास विरोध करण्यात येईल. हा प्रकल्प आम्ही येथे चालू करुन देणार नाही. या प्रकल्पाचा आम्ही निषेध करतो. तरी प्रशासनास व प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती करतो की हा प्रकल्प लादण्याचा प्रयत्न करु नका. या परिसरात आदिवासी पाडे, वस्ती आहे. नदी आहे, वन्यक्षेत्र आहे.

ते पुढे असे म्हणाले की जैविक कचरा म्हणजे मुंबई, पुणे येथील मोठ्या हॉस्पिटलमधून जो वैदकीय कचरा निर्माण होतो तो येथे प्रक्रिया करण्यासाठी आणला जाईल व येथे प्रदूषण होईल व रोगराई निर्माण होईल त्यास आमचा विरोध आहे. तरी नम्रपणे विनंती करतो की या प्रकल्पाच्या विरुध्द ग्रामस्थांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. तरी येथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये. येथील ग्रामपंचायतीने ना हरकत प्रमाणपत्र अदा केलेले होते. मात्र प्रकल्पाबाबत सर्व माहिती मिळाल्यानंतर अदा केलेले ना हरकत प्रमाणपत्र रदबादल केलेले आहे. तसे पत्रही प्रशासनास देण्यात आलेले आहे. तरी आमची विनंती आहे की या कारखान्यास येथे परवानगी देण्यात येऊ नये. तरी स्थानिकांच्या तीव्र भावनांचा उल्लेख बैठकीच्या इतिवृतान्तात

करण्यात यावा व त्या इतिवृतान्ताची प्रत प्रत्येक ग्रामपंचायतीस पाठविण्यात यावी.

२) **श्री अंकीत साखरे, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, देवन्हावे, जिल्हा-रायगडः-**

येथे म.प्र.नि.मंडळाने आयोजित केलेल्या जनसुनावणीस येथील पंचक्रोशीतील, तालुक्यातील विविध मान्यवर उपस्थित आहेत. माझे मनोगत मांडण्याअगोदरच मी प्रशासनास विनंती करतो की लोकभावनेचा आदर करुन सदरहू प्रकल्प हा रद्द करण्यात यावा. आमच्या तालुक्याने मुंबईचा भार किती सहन करायचा? मुंबईच्या विविध हॉस्पिटलमधील कचरा येथे आम्ही का आणून द्यायचा. आम्हीपण माणसे आहोत. या प्रकल्पाच्या दुष्परिणामामुळे आमची पुढची पिढी जर बरबाद होणार असेल, तर सर्व पंचक्रोशीतील, तालुक्यातील सर्व नागरिकांचा या प्रकल्पास विरोध आहे. आपण सादरीकरणात विविध पाण्याचे स्त्रोत दाखविले, तर अतकर गावातील पाझर तलावाचा उल्लेख का नाही? मप्रनि मंडळाच्या अधिका-यांनी आता तरी बघावे, कसे आमचे नाले,. नद्या प्रदूषणामुळे हिरवे झालेले आहेत. या तालुक्याने चांगल्या उद्योगाचे स्वागत केलेले आहे, पण प्रदूषणकारी कारखान्याचा त्रास हा तालुका कधिच सहन करणार नाही. येतील सर्व पक्षांच्या प्रतिनिधींनी या प्रकल्पास विरोध केलेला असून जर दडपशाहीने प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही तीव्र विरोध करु. या तालुक्यातून जाणारे सर्व रस्ते आणि एक्सप्रेस हाय वे बंद करुन आम्ही विरोध करु. तरी प्रशासनास विनंती आहे की या तालुक्यातील नागरिकांवर पोलिस दडपशाहीचा वापर करु नये.

लोकभावनेचा आदर करुन सदरहू प्रकल्प रद्द करण्यात यावा ही विनंती करतो.

३) **<u>श्री एकनाथ पिंगळे, राहणार-वडवली गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

बैठकीत स्थानिक दोन लोकांनी माहिती सांगितली की कशाप्रकारे विरोध आहे. येथे प्रशासनास लोकभावना दिसल्या आहेत. पुर्वी येथे प्रकल्प येताना स्थानिकांनी नम्रपणा व सहकार्य स्विकारले होते. पण त्या प्रकल्पामुळे स्थानिकांनाच त्रास होत आहे. येथील शेतक-यांची येणारी पीके ही करपून जात आहेत. भाजीपाला पिकविणारा शेतकरी काहीही पिकवू शकत नाही. कारण येथील नद्या प्रदूषणामुळे हिरव्या झालेल्या आहेत.डोंगरातून येणारे शुध्द पाणी येथील कंपन्यांच्या प्रदूषणामुळे पूर्णपणे हिरवे होते, एसएमएस कंपनीमुळे त्या प्रदूषणात भर पडेल, म्हणून स्थानिक एसएमएस प्रकल्पास विरोध करत आहेत. आम्हांला माहित आहे की मुंबईतील एका लोकप्रतिनिधींना प्रदूषणामुळे हा कारखाना तेथे नको, म्हणून गेले ८-१० वर्षे तेथे चालणारा कारखाना येथे आणत आहेत.आम्हीसुध्दा माणसे आहोत. तर येथे सदरहू प्रकल्प येऊच देऊ नये असा न्याय येथील स्थानिकांना द्यावा ही विनंती. जर कारखाना आला, तर येथील लोकांना तेथे फिरतासुध्दा येणार नाही. माणसांबरोबरच पशूपक्षी, जनावरे यांचा विचार करण्यात आला पाहिजे. तेथे जंगल क्षेत्र आहे. त्याचप्रमाणे प्रकल्प स्थानाजवळ एक बंधारा असून तेथील १०-१५ गावे पाणी पीत आहेत. प्रस्तावित प्रकल्पामुळे जर प्रदूषण झाले, तर ती गावे पाणीसुध्दा पिऊ शकणार नाही. त्यांना पाणी विकत घ्यावे

लागेल. आपण एकदाच कारखाना टाकाल, पण तेथील लोकांचे नुकसान कराल, त्यांना रोज पाणी विकत घ्यावे लागेल. तरी या प्रकल्पास संपूर्ण तालुक्याचा विरोध आहे, तो विरोध कायम राहिल, म्हणून सदरहू प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये.

४) **श्री संदीप संभाजी देशमुख, राहणार-आडोशी गाव, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

त्यांनी सांगितले की आता कंपनीतर्फे सादरीकरण ज्या संस्थेने केले आहे, त्या संस्थेचा आम्ही पूर्णपणे निषेध व्यक्त करतो. कारण पुर्णपणे खोटे सादरीकरण करण्यात आलेले आहे. कारण सदरहू संस्था ही स्थानिक लोकांची, शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न सादरीकरणाव्दारे करत आहे. सर्व गावक-यांच्या वतीने संबंधित संस्थेविरुध्द कारवाई करण्यासाठी आम्ही न्यायालयात जाणार आहोत. आमच्या येथील आडोशी पाझर तलाव दाखविण्यात आलेला नाही. ज्या गट नं. २३१ मध्ये सदरहू प्रकल्प उभारणार आहात, त्यालागूनच पाताळगंगा नदीचा प्रवाह वाहत आहे. तोही त्यांनी दाखविला नाही. जर प्रकल्प सुरु होण्या अगोदरच एवढा खोटारडेपणा करणार असतील, तर स्थानिक जनता सहन करणार नाही. त्यांनी सांगितले की आताच निरोप आला की रायगड जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत आज ठराव मंजूर करून सदरहू प्रस्तावित एसएमएस प्रकल्पाचा निषेध करण्यात आलेला आहे. या कंपनीस बंधनकारक असलेले कोणतेही दाखले हे रायगड जिल्हा परिषद भविष्यात देणार नाही असेही ठरावात नमुद करण्यात आलेले आहे.

श्री संदीप देशमुख यांनी आक्षेप नोंदविला की सादरीकरणात दाखविले आहे की येथे कोणतेही वन्यजीव नाहीत. आम्ही वनविभाग खालापूरला अर्ज केलेला असून त्याची माहिती आम्हांला लवकरच मिळेल. २-३ दिवसांची मुदत देण्यात यावी. ती मिळाल्यानंतर सादर करण्यात येईल. प्रकल्प स्थानाच्या ३०० मीटर्स आतमध्ये वनक्षेत्र आहे. त्या वनक्षेत्रात वन्यजीव आहेत.येथे जो रानमेवा आहे, त्यावर तेथील आदिवासी जमातींचा उदरनिर्वाह होतो, म्हणजे  जांभळे, करवंदे असतील ती आहेत. त्याशिवाय या वनविभागात औषधी वनस्पती आहेत. त्याची नोंद वनविभागाच्या दफ्तरी आहे.ती शासकीय माहिती आम्ही तुम्हांला सादर करणार आहोत. या शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात बाबासाहेबांनी सर्वांना समान अधिकार दिलेले आहेत, आम्ही कोणतीही दडपशाही सहन करणार नाही.  अखेरच्या श्वासापर्यंत या प्रकल्पास विरोध राहिल.  जे गोवंडीत झाले, ते येथे आम्ही होऊ देणार नाही. तरी शासनास, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस नम्र विनंती आहे की  सदरहू प्रकल्पास सहकार्य करु नये.

यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत श्री संदीप देशमुख यांना  सांगितले की येते कुठल्याही प्रकारची दडपशाही करण्यात आलेली नाही. येथील स्थानिक लोकांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी असलेले आक्षेप, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यास व शासनास सादर करण्यासाठीच आलेलो आहोत. कुठल्याही प्रकल्पास पर्यावरणविषयक व्यवस्थापन योजना स्थानिक जनतेस सांगणे

बंधनकारक असून ती १०-१५ मिनिटांचे सादरीकरण असते. येथे कुठल्याही प्रकारची दडपशाही करण्यात आलेली नसून लोकशाही पध्दतीने आपल्या सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी आलेलो आहोत. आपले म्हणणे रेकॉर्ड होत आहे. बैठकीची व्हिडिओ शुटींगही होत आहे. आपण उपस्थित केलेल्या सुचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतान्तात समावेश करण्यात येईल.

५) **<u>श्री संदीप तातुराम पाटील, तालुका अध्यक्ष, शेतकरी कामगार पक्ष, राहणार- आत्करगाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

आम्ही मागणी केली होती की ग्रामपंचायतीने सदरहू प्रकल्पास ना हरकत प्रमाणपत्र (NOC) दिले आहे का?त्यांनी ग्रामसेवकाने पाठविलेले लेखी पत्र वाचून दाखविले. त्यात ग्रामसचिव यांनी असे नमुद केलेले आहे की एसएमएस कंपनीने विविध परवान्यांसाठी अर्ज केलेला होता. मात्र त्या कंपनीच्याविरुध्द ग्रामस्थांनी अनेक तक्रारी केलेल्या असून त्यांनी एसएमएस कंपनीसाठी कोणत्याही ना हरकत प्रमाणपत्रावर स्वाक्षरी केलेली नाही किंवा असा कोणताही दाखला कंपनीस दिलेला नाही.

श्री संदीप पाटील यांनी येथे आक्षेप नोंदविला की कंपनीने चुकीची माहिती ग्रामस्थांना कशी दिली की त्यांना ना हरकत प्रमाणपत्र ग्रामपंचायतीने मंजुर केलेले आहे? जर त्यांना चुकीचे पत्र/ना हरकत प्रमाणपत्र अदा केलेले असेल, तर संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई व्हावी.

६) **<u>श्री रामचंद्र देशमुख, राहणार-साजगाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, सदस्य, महाराष्ट्र राज्य,शेतकरी कामगार पक्षः-</u>**

त्यांनी मत मांडले की जनसुनावणीस सुरवात होताना असे दिसले की लोकांचा प्रक्षोभ होत असतानाही वाचन चालू होते. त्यामुळे जनतेचा प्रक्षोभ असताना काय बोलले हे कळलेच नाही. याठिकाणी सर्वांनाच सदरहू प्रकल्प नको असेच दिसते. तर ज्यांना कोणाला हवा आहे, त्यांचे प्रथम मत घेण्यात यावे. येथे वन्यप्राणी नाहीत असे नमूद केलेले आहे. तर माणसांना जीव आहे, हा विचार व्हावा. येथे असे निदर्शनास येते की लहान मुलांमध्येही दमा, खोकला असे आजार मोठ्या प्रमाणात दिसून येतात.तर नुसता विकास नको, तर माणूस जगला पाहिजे. मुंबईच्या लोकप्रतिनिधी आक्षेप नोंदविल्यामुळे सदरहू प्रकल्प आता आमच्या गावात येत आहे. तरी सदरहू प्रकल्प आम्ही सर्व ग्रामस्थ येथे होऊ देणार नाही. या रायगड जिल्ह्याला फार मोठा इतिहास आहे. रायगडच्या लोकांना डिवचण्याचा प्रयत्न करु नये.

७) **<u>श्री काशीनाथ सदाशिव पारटे, मु. वणवे, ता. खालापूर, जि. रायगड-</u>**

त्यांनी प्रस्तावित प्रकल्पास निषेध करीत सांगितले की परिसरात काही मंदिरे व गावदेवीचे मंदिर आहे. त्याची शासनाने दखल घेणे गरजेचे आहे. मी वारकरी संप्रदाय स्विकारला असून वारकरी संप्रदायाचा प्रतिनिधी म्हणून सांगतो की प्रस्तावित प्रकल्पाच्या विरुध्द महाराष्ट्र वारकरी मंडळाचे अध्यक्ष श्री बंडातात्या कराडकर या लढ्यात उतरतील.

८) **श्री चंद्रकांत गोविंद देशमुख, राहणार-आडोशी, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी सांगितले की सादरीकरण करत असताना आपण स्थानिकांचा प्रक्षोभ पाहिलात. कारण सादरीकरण आज झाले, मात्र आम्ही स्थानिकांनी गेले तीन महिने या प्रकल्पाबाबतची संपूर्ण माहिती यु ट्युबवरुन मिळविलेली आहे. त्यांनी पर्यावरणाच्या विविध अधिसूचना वाचून दाखवत बैठकीत सांगितले की सदरहू प्रकल्प प्रवर्तकांनी आम्हांला सांगितले की या प्रकल्पामुळे कोणतेही प्रदूषण होत नाही. पर्यावरणात सर्व पशू, पक्षी, वातावरण, जल, हवा, जमिन, भूगर्भ या सर्वांचा समावेश केलेला असतो. तर या नियमांचे उल्लंघन केल्यास तो कदापिही सहन केला जाणार नाही. सदरहू प्रकल्प अधिकारी असे सांगतात की येथे फक्त जैव वैदकीय कच-याची विल्हेवाट लावण्यात येईल. पण त्या प्रक्रियेतही धुर हा हवेत सोडला जाणार आहे, तो रोगांना आमंत्रण देणारा आहे. प्रकल्प अधिकारी सांगतात की प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रदूषण होत नाही. मग गोवंडीवरुन इकडे प्रकल्प आणण्याची काय आवश्यकता आहे? याचे विश्लेषण करण्यात यावे. तरी आमच्या निषेधाची नोंद घेण्यात यावी. या प्रकल्पास आमचा विरोध आहे.

९) **श्री किशोर पानसरे, नगरसेवक, खोपोली नगरपरिषद,तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी सांगितले की मी संकल्प सामाजिक संस्थेचा अध्यक्ष या नात्याने बोलत आहे. ते म्हणाले की मी येथील पंचक्रोशीतील

पाचही ग्रामपंचायतींचे, सर्व राजकीय पक्षांचे आभार मानतो की या प्रकल्पाच्या विरोधासाठी सर्वजण एकजुटीने येथे जमलेलो आहोत. येथे कुठलेही राजकारण नाही, तर जनतेच्या प्रश्नांसाठी सर्वजण एकत्र आलेलो आहोत, हा जनतेचा उद्रेक आहे याची दखल शासनाने घेतली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेनुसार आपल्या सर्वांच्या समाजकार्यांचा केंद्रबिंदु ही जनता आहे, मनुष्य आहे. त्यासाठी प्रदूषण नियंत्रण विभाग सुरु करण्यात आलेला आहे की त्यायोगे कुठलेही प्रदूषण होऊ नये.

त्यांनी आक्षेप नोंदविताना मत मांडले की सदरहू कारखाना मुंबईहून हलविण्याचा आदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाचा आहे याची जाणीव आम्हांला असली पाहिजे. तो कारखाना कुठल्या कारणांसाठी हलविण्याचे आदेश दिलेले आहेत, तर तेथील लोकप्रतिनिधींनी प्रदूषण होत असल्याने सदरील कारखाना हलविण्याची मागणी केली. त्यामुळे सदरहू कारखाना हलविण्याचे आदेश हे पर्यावरण विभागाने काढले. तर सदरहू कारखाना आम्ही का घ्यायचा व आपण पर्यायी जागा दुसरीकडे बघण्याची सूचना केली. येथे हा कारखाना आणलेला आम्हांला चालणार नाही. त्यांनी आक्षेप नोंदविला की नगरसेवक या नात्याने मी नगरपालिकेस पत्र दिलेले आहे की सदरहू कारखान्यामुळे हवेचे प्रदूषण होणार आहे. आमची नगरपालिका तर जवळच आहे. तर हवेचे प्रदूषण होईल म्हणून हा कारखाना येथे येऊ नये म्हणून मी स्वतः शासनास व खोपोली नगरपरिषदेला हा कारखाना या परिसरात येऊ नये असे कळविलेले आहे. तरी हा कारखाना येथे येऊ नये अशी स्थानिक जनतेची भावना आहे हे शासनास

पर्यावरणविषक जाहिर जनसुनावणी समितीने कळवावे. तरी मी सर्वांना धन्यवाद देती की जनतेच्या प्रश्नांसाठी एकत्र आलेलो आहोत.

**१०) <u>श्री सुनील पाटील, राहणार-ताके गाव, तालुका - खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

त्यांनी सांगितले की येथे ब-याच पक्षाच्या प्रतिनिधींनी भावना व्यक्त केल्या. त्या नागरिकांच्या भावना आहेत. याची नोंद घेण्यात यावी. गोवंडी, मुंबईहून कारखाना शासनाची दिशाभूल करुन येथे येणार असेल तर येथे मोठा आक्रोश पाहायला मिळेल. प्रकल्पाच्या जवळ पाझर तलाव आहे. तर जे काही पाणी पाताळगंगेस जाते, ते हिरवेगार झालेले आहे. सदरहू प्रकल्प येथे येऊ नये म्हणून खोपोली नगरपरिषदेचा ठरावही उपलब्ध करुन देण्यात येईल.

**११) <u>सौ. दलीना वाघमारे, सदस्य, अतकरगाव ग्रामपंचायत, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः</u>**

प्रस्तावित प्रकल्पाच्या जवळ आमच्या दोन वाड्या आहेत. सदरहू प्रकल्पामुळे आमच्या मुलांना त्रास होईल, तरी सदरहू प्रकल्प आपल्या गावात नको. त्यांनी लेखी निवेदन पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस सादर केले.

**१२) श्री नरेन्द्र चंद्रकांत गायकवाड, राहणार-अतकरगाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, अध्यक्ष, रायगड जिल्हा, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाः -**

त्यांनी प्रथम पंचक्रोशीतील सर्व ग्रामपंचायत, ग्रामस्थ यांना धन्यवाद दिले की आज ते सर्वजण एका जनतेच्या हिताच्या निर्णयासाठी एकत्र आले. जर एखादा प्रकल्प जर जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक असेल, तर त्याचा निषेध, विरोध केलाच पाहिजे. आज सर्वांची जनभावना येथे दिसत आहे. ही पूर्वी येणा-या प्रदूषणकारी प्रकल्पाबाबत घेतली असती, तर आज ज्या प्रदूषणामुळे सर्व स्थानिक त्रस्त आहेत, कदाचित त्याचा त्रास झाला नसता. येथे बरेच स्टील व रासायनिक कारखाने आहेत. या कारखान्याच्या प्रदूषणामुळे सर्व जनता त्रस्त झालेली आहे. त्यात एसएमएस कारखान्याबाबत स्थानिक जनतेची भावना तीव्र आहे. तर प्रस्तावित प्रकल्पाबाबत जे काही गैरसमज सर्व ग्रामस्थांमध्ये पसरले आहेत, त्याबाबत स्पष्टीकरण हे म.प्र.नि. मंडळाने द्यावे.

त्यांनी पहिला प्रश्न विचारला की जर एखादा कारखाना प्रदूषणकारी असेल, तर त्याची सुनावणी म.प्र.नि. मंडळ आयोजित का करते?जनतेचे मत घेऊन आपण काय करणार, जनता आपले मत मांडणार, येणा-या प्रकल्पाविषयी त्रोटक माहिती जनतेस उपलब्ध करण्यात येते, त्यामुळे जनतेस प्रश्न मांडता येतच नाहीत.

म.प्र.नि. मंडळाने जनतेच्या प्रश्नांचा विचार केला पाहिजे. हा कारखाना गोवंडी येथून येथे का येतो, जर या प्रकल्पामुळे आरोग्याच्या प्रश्नांनी तेथील जर जनता त्रासलेली असेल, तर येथील स्थानिक जनतेस तो त्रास होईल. चॅनेलच्या बातम्यांमुळे लोकांमध्ये भितीचे वातावरण आहे. तो काऱखाना दुसरीकडून येथे आणण्याचे कारण काय याचे स्पष्टीकरण दिलेले पाहिजे. जर येथे प्रदूषण झाले, तर ते प्रदूषित पाणी पाताळगंगेला मिळेल, त्या प्रकल्पात जो जैव वैदिक कचरा आहे, त्याबद्दल काहीच माहिती दिलेली नाही. तसेच सदरहू माहिती जर ग्रामस्थांना अगोदर दिली असती, तर त्यांना प्रश्न विचारत आले असते. येथे कुठलाहा नागरिक, पशू, पक्षी असेल, या कंपनीच्या कारखान्यामुळे प्रदूषणाचा त्रास होत असेल, तर त्या कंपनीचा आपण निषेध करतो.

यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रश्न तेचतेच उपस्थित करण्याऐवजी नवीन मुद्दे घ्यावेत अशी सूचना केली. त्यावेळी श्री नरेन्द्र गायकवाड यांनी समितीस जे लेखी प्रश्न सादर करण्यात आले, त्याचेही उत्तर देण्यात यावे अशी सूचना केली. त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रश्न विचारण्यास सांगितले व त्याचे उत्तर त्वरित देण्याची सूचना केली.

श्री. गायकवाड यांनी प्रश्न विचारताना सांगितले की आम्ही नवीन उद्योगांचे स्वागत करतो. पण जर एखाद्या उद्योगामुळे नदीवरिल जॅक वेल काढण्यात येत असेल, प्रस्तावित

उद्योगाच्या जैव वैदकीय कच-यामुळे जल, वायू प्रदूषण होणार असेल, , तर अशा प्रकल्पाचा आम्ही निषेध करतो. यावेळी अध्यक्षा यांनी उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पातील जैव वैदकीय कचरा हा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी निर्देश केलेल्या मानकांप्रमाणेच बंद गाडीतून ज्याठिकाणी हा कचरा तयार होईल तेथून आणण्यात येईल.

त्यावेळी उपस्थित स्थानिकांनी नाही नाही अशा घोषणा देण्यास सुरवात केली. उपस्थितांनी बराच विरोध केला. त्यांनी प्रकल्पाच्या विरुध्द हाय हाय घोषणा दिल्या.

१३) **मिस पल्लवी पाटील, राहणार-अतकरगाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड यांनी आक्षेप नोंदविला की** सदरहू जैव वैदकीय कच-याचा या पिढीला व पुढील पिढीला त्रास होईल. जर तेथील कचरा बंद गाडीतून आणणार आहात, तर तेथून येथे का आणता? आमचा या कंपनीस निषेध आहे. त्यावेळी मिस पल्लवी पाटील यांनी निषेधाची घोषणा केली. त्यास सर्व उपस्थितांनी साथ दिली.

१४) **श्री मंगेश देशमुख, राहणार - आडोशी गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी मत मांडले की बैठकीतील जनतेचा उद्रेक हा आजच व एकट्या प्रस्तावित प्रकल्पामुळे उद्भवलेली नाही. आम्ही स्थानिक जे गेले अनेक वर्षे भोगत आहे, त्याचा हा परिणाम आहे. त्यात एसएमएस कंपनी येण्यामुळे आगीत

तेल ओतल्यासारखे झालेले आहे. आज आमच्या गावाचे पाणी पूर्णपणे खराब झालेले आहे. मग गेले २५ वर्षे म.प्र.नि. मंडळाने काय केले? येथे संध्याकाळची परिस्थिती पहा, अर्धा कि.मी. येथे धुर असतो. येथे किती कारखाने यावेत यावर काही बंधने आहेत काय? शासनाने काही धोरण निश्चित केलेले आहे काय, एखाद्या क्षेत्रात किती कारखाने असावेत, किती भातशेती असावी याबाबत काय धोरण आहे? येथील आमचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. करो या मरो या स्थितीत आम्ही सर्वजण आहोत. जर आम्हांला न्याय मिळत नसेल, तर आम्ही ज्या मार्गाने मिळणार असेल, त्या मार्गाने जाऊ.

१५) **<u>श्री सुनील सुखदरे, राहणार-ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा - रायगडः-</u>**

येथे गावातील प्रतिनिधींनी प्रस्तावित प्रकल्पाच्या विरुध्द जे मत मांडले, त्यास माझेही समर्थन आहे.

१६) **<u>श्री मनिष वामन खवले, राहणार-ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा - रायगड त्यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की-</u>**

अ) बैठकीत सांगण्यात आले की प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा सार्वजनिक करण्यात आला. विविध ग्रामपंचायतीत तो जनतेसाठी उपलब्ध करण्यात आला. जर तो सार्वजनिक करण्यात आला, तर त्याचे प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सार्वजनिक वाचन झाले का? गावातील

प्रत्येक नागरिकाला तो मिळाला का? मी अतकरगाव ग्रामपंचायतीस चौकशी केली असता असे कळले की काल सकाळी हा अहवाल अतकरगाव ग्रामपंचायतीस प्राप्त झाला. जर लोकशाही अधिकार सर्वांना दिले आहेत. तर दडपशाहीने प्रशासनाकडून काम करण्यात येत असेल, तर त्याचा जाहिर निषेध व्यक्त करतो,

ब) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात हवेची दिशा ही पूर्वेकडून पश्चिमेकडे दाखवलेली आहे. त्यांनी आक्षेप नोंदविला की कोकण परिसरातील हवा ही पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते.

क) अहवालातील पाण्याबाबत टिप्पणीवर त्यांनी मत व्यक्त केले की ज्या अतकर गावातील कुठलेही पाणी पिण्यायोग्य आहे असा अहवाल देत असेल, तर त्याचा जाहिर सत्कार करावा लागेल.

ड) एसएमएस प्रकल्पासाठी जैव वैदकीय कचरा आवश्यक आहे. हा जैव वैदकीय कचरा प्राणी व मनुष्यावर खुला दुष्परिणाम (Direct Effects) करणारा आहे.

इ) प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सदरहू प्रकल्प जागा ही रेड संवर्गात असल्याने येथे प्रकल्प टाकण्यात येणार आहे.

श्री खवले यांनी मत मांडले की जरी प्रकल्प स्थान रेड संवर्गात (Red Zone) येत असेल, तरी जर सदरहू जैव वैदकीय कचरा प्राणी व मनुष्यावर खुला दुष्परिणाम (Direct Effects) करणारा असल्याने शासनाने अशा जैव वैदकीय कचरा प्रक्रियेसाठी वेगळा संवर्ग/विशेष सवंर्ग (Separate Zone/Special Zone) तयार करावा. त्यावेळी अध्यक्षा यांनी श्री खवले या तांत्रिक मुद्दयांवर

स्पष्टीकरण हवे आहे काय याबाबत विचारणा केली असता श्री खवले यांनी १००% स्पष्टीकरण हवे असल्याचे सांगितले. कारण ही जनसुनावणी असल्याने याचीही नोंद होणे गरजेचे आहे. उद्या या प्रकल्पाबाबत काही न्यायिक प्रक्रिया (Judicial Process) सुरु झाल्यास प्रशासनाकडून कोणती उत्तरे जनसुनावणीत देण्यात आली हेही महत्वाचे आहे. अध्यक्षा यांनी पर्यावरण सल्लागार यांना उत्तर देण्याची सूचना केली.

ई) यावेळी श्री खवले यांनी पर्यावरण सल्लागार यांना विचारणा केली की आपण जो अहवाल तयार केला, त्याच्याशी आपण पूर्ण सहमत आहात काय? पर्यावरण सल्लागार यांनी पूर्णपणे सहमत आहे असे सांगितले. त्यावेळी हवेची दिशा ही पूर्वेकडून पश्चिमेकडे दिलेली आहे. ती सत्य आहे काय? यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की वा-याची दिशा ही अध्ययन कालावधीच्या वेळची दिलेली आहे. श्री खवले यांनी सांगितले की आपण गोलगोल उत्तरे देऊ नका. आपण पूर्वेकडून पश्चिमेकडे वारे वाहत होते हे खरे आहे काय, यास त्यांनी होकार्थी उत्तर दिले. श्री खवले यांनी अध्यक्षा यांना ही नोंद घेण्याची विनंती केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ०६ ऑक्टोबर, २०२० ते ०२ जानेवारी, २०२१ या कालखंडात हिवाळ्यात कोकण पट्टीत प्रामुख्याने वारे हे पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते.

श्री खवले यांनी उत्तर दिले की आम्ही येथे राहतो, येथे पावसाळ्याच्या सुरवातीस वारे हे पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते. बाकी वर्षभर हे वारे पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. संबंधित

पर्यावरण सल्लागार हे त्यांचे म्हणणे आमच्यावर बिंबवण्याचा प्रयत्न करत आहेत. अध्यक्षा यांनी याची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

श्री खवले यांनी पुढे आक्षेप नोंदविला की हवेची आदर्ता याबाबत दिलेली मानके ही इंग्रजीत आहेत. मराठीत अहवाल, पण त्यात नांवे इंग्रजीमध्ये दिलेली आहेत. अध्यक्षा यांनी आदर्तेबाबत माहिती देण्याची सूचना केली.

यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की कार्यकारी संक्षिप्त अहवाल मराठीत दिलेला असून त्यासोबत सर्व ग्रामपंचायतीत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल संपूर्ण दिलेला आहे. श्री खवले यांनी संबंधित ईआयए मराठीत दिलेला आहे काय याबाबत विचारणा केली. आपण तांत्रिक शब्द वापरुन केलेला अहवाल सामान्य माणसाला काय कळणार?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांच्या अधिसूचनेनुसार ईआयए अहवाल हा संक्षिप्त रुपात स्थानिक भाषेत देणे बंधनकारक आहे. त्यानुसार त्याचा कार्यकारी संक्षिप्त अहवाल हा मराठीत उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. यावेळी श्री खवले यांनी आक्षेप नोंदविला की महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी केलेल्या निर्देशांनुसार आणि न्यायालयानेही दिलेल्या विविध निर्णयांनुसार सर्व अहवाल हा मराठीतूनच जनतेसाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. अध्यक्षा यांनी त्याबाबत नोंद घेतल्याचे सांगितले.

अध्यक्षा यांनी श्री खवले यांनी पुढील आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. श्री खवले यांनी विचारले की मुद्दा ३ मध्ये पाण्याचा दर्जा बाबत टिप्पणी केलेली आहे की स्थानिक लोक धुणी, भांडी यासाठी पाणवठे, नदीच्या किना-याचा वापर करत असल्याने, पावडर वापरत असल्याने पाणी खराब झालेले आहे. म्हणजे जे पाणी कंपन्यांमुळे खराब झालेले आहे, तर कारखान्यांऐवजी ग्रामस्थांना जबाबदार धरण्यात येत आहे. याचा खुलासा करण्याची मागणी सर्व उपस्थितांनी केली. उपस्थितांनी या मुद्द्यावर घोषणा देण्यास सुरवात केली.

यावेळी अध्यक्षा यांनी पान नं. ३२ बाबत खूलासा करण्याची सूचना केली. पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की फिकल कॉलिफॉर्म आणि बीओडी म्हणजे जो जैववैविधता घटक असतो की ज्यामुळे जीवजंतु होतात ते केमिकलमुळे दूषित झालेल्या पाण्यात नसतात. घरगुती सांडपाण्यामुळे जे दूषित पाणी तयार होते, त्यात फिकल कॉलिफॉर्म असतात, ते संभाव्य धोके सांगितलेले आहे. श्री खवले यांनी सांगितले की याचा अर्थ आपण प्रदूषण होणार नाही म्हणता, पण प्रदूषण होणार.

श्री खवले यांनी पुढे प्रश्न विचारला की आपण दोन तासांसाठी प्रत्येक टनाच्या दोन भट्ट्या चालविणार आहेत. त्यामुळे आपण भविष्यात आपल्या कंपनीतील धुराचा त्रास स्थानिकांना झाल्यास आपण दुस-या कंपनीमुळे होतो असेच प्रतिपादन कराल. कारण पाणवठ्यावर आमच्या गावाचा कोणताच माणूस जात नाही.

त्यांनी पुढे झाडांबाबत प्रश्न विचारला की प्रकल्पात झाडे लावली गेली पाहिजे याबाबत जबाबदारी कोणाची आहे? प्रदूषण नियंत्रण मंडळाची आहे की प्रशासनाची आहे? अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प विकसित करताना ती प्रकल्प प्रवर्तकांची, नंतर प्रदूषण नियंत्रण मंडळ, नंतर डिश, नंतर स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांची त्यावर देखरेख असते व प्रकल्प प्रवर्तकांकडून ते करुन घेणे अपेक्षित आहे.

त्यावेळी श्री खवले यांनी सांगितले की त्यांना लेखी उत्तर हे प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेले आहे की झाडे लावणे हे आमचे काम नाही. महसूल खात्याबाबत लोकशाहीदिनात गेले दोन वर्षे तक्रार दाखल आहे, ती प्रलंबित आहे.

श्री खवले यांनी मत मांडले की गोवंडीहून ही कंपनी येथे आणण्याचा घाट चालू आहे, तर त्यासाठी शासनाने विशेष क्षेत्र/Special Zone निर्माण करावा, जेथे मनुष्यवस्ती, प्राणी नसतील, तेथे स्थलांतर करावे, आमच्या गावात, तालुक्यात आणू नये. प्रकल्प जरी गरजेचा आहे, तरी तो माणसाला, प्राण्यांना मारणारा नसावा.

श्री खवले पुढे म्हणाले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी दिलेले अहवाल हे संपूर्णपणे खोटे असून मी त्याचा निषेध करतो. प्रकल्प धारकांना विनंती करतो की योग्य काळात न्याय मिळावा.

श्री खवले यांनी वन परिक्षक कार्यालय, खालापूर यांचे पत्र वाचून दाखविले. त्यांनी इतिवृतान्ताची प्रत उपलब्ध करुन देण्याची मागणी केली.

**१७) <u>अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>**

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी चर्चेत ब-याच जणांनी उपस्थित केलेल्या २-३ मुद्द्यांबाबत स्पष्टीकरण करण्याची सूचना केली. एक म्हणजे पाझर तलाव दाखविलेला नाही, नदीचे पात्र दाखविलेले नाही, वन्यक्षेत्र दाखविलेले नाही, अहवालात वन्यप्राणी नाही असे नमूद केले, मात्र वनविभागाचा अहवाल वन्यप्राणी आहे असे दर्शवितो.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की अहवालात ५२ प्रकारचे वन्यजीव प्रकल्पाच्या परिघात (१० कि.मी.) आढळतात असे नमूद केलेले आहे. मात्र अहवालाल असेही नमुद केलेले आहे की ज्या विलुप्त होणा-या प्रजाती (Endangered Species) आहेत (शेडुल्ड १ प्रमाणे) , त्या कुठल्याही प्रजाती म्हणजे प्राणी वन्यजीव असेल, त्या प्रकल्प क्षेत्र परिघात (१० कि. मी.) नाहीत.

यावेळी श्री खवले यांनी आक्षेप नोंदविला की शेकरु हे विलुप्त होणा-या प्रजाती (Endangered Species) आहेत (शेडुल्ड १ प्रमाणे). फक्त येथे पर्यावरण सल्लागार हे त्यांची कातडी वाचविण्यासाठी अध्ययन काळात आढळले नाही असा उल्लेख करत आहेत. आपण सारांश सांगणे अपेक्षित आहे. येथील क्षेत्राशी आमचा ३६५ दिवस संबंध येतो. येथे शेकरु आढळते.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पुढील मुद्दा वनक्षेत्राबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. गट नं. २३१ प्रकल्प स्थानाशेजारी वनविभागाची जागा आहे असे ब-याच उपस्थितांचा आक्षेप आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणाच्या पान नं.८ प्रमाणे संरक्षित क्षेत्र/अभयारण्य यात संरक्षित वन (Protected Forest) पश्चिम दिशेस २.९ कि.मी. तर दुसरे संरक्षित वन (Protected Forest) हे उत्तर दिशेस ९.१ कि.मी. अंतरावर आहे. तर पश्चिम, पूर्व आणि दक्षिण दिशांकडे एकूण १२ राखीव वनक्षेत्र (Reserved Forest) आढळली असा उल्लेख आहे.

श्री खवले यांनी प्रश्न विचारला की प्रकल्पातील धुर हा किती परिघात (radius) जाणार आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात सांगितल्याप्रमाणे १,०८० मीटर ते १,०८८ मीटर परिघातच धुर येईल. त्याचे मॉडलिंग आणि स्टिमुलेशन देण्यात आलेले आहे.

श्री खवले यांनी याचे मोजमाप कसे करण्यात येईल याबाबत विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरण अनुमती घेताना एअर मोड (Air Mode) जे सॉफ्ट वेअर आहे, त्यास डेटा दिला त्याचप्रमाणे म.प्र.नि.मंडळात जो डेटा संकलित करतात, त्याअनुषंगाने एअर मोड (Air Mode) सॉफ्ट वेअर कार्यान्वित होते, त्या मानकांनुसार मोजमाप करण्यात येते.

श्री खवले यांनी सांगितले की आपण अंगिकारलेली पध्दतच इतर कंपन्यात कार्यान्वित असून तेथे प्रदूषण होते. त्यामुळे या पध्दतीनेही प्रदूषण हे होणार आहे.

यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर बंधनकारक असणारी ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टिम कार्यान्वित करण्यात येणार आहे. ती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरला जोडलेली असते.

श्री खवले यांनी परत इतर कंपन्यांचा उल्लेख केला असता अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली जनसुनावणी ही ज्या प्रकल्पाची आहे, त्याबाबत सूचना वा आक्षेप उपस्थित करण्यात यावे.

अध्यक्षा यांनी मत मांडले की ६५ मीटर्सच्या उंचीमुळे हवेचे प्रदूषण येथे होणार नाही हे पर्यावरण सल्लागार यांचे मत आपणास मान्य नाही असे समजायचे का, व त्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पाझर तलावाबाबत उत्तर देण्याची सूचना पर्यावरण सल्लागार यांनी केली. ब-याच स्थानिकांनी आक्षेप नोंदविला की अहवालात पाझर तलावाचा उल्लेख नाही. पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात सांगितल्याप्रमाणे आडोशी पाझर तलाव आहे, तो ६०० मीटर अंतरावर आहे हे नमुद केलेले आहे.

श्री खवले यांनी आक्षेप नोंदविला की पाण्याचे नमुने गोळा केले, त्यात उल्लेख नाही. वनक्षेत्राचे अंतरही चुकीचे दाखविलेले आहे. हा अहवाल चुकीचा आहे. त्यामुळे त्यावर आधारलेली ही बैठक चुकीची आहे, तरी परत सर्वेक्षण करण्यात यावे, त्यात स्थानिकांचा सहभाग घेण्यात यावा व नंतर त्याबाबत पुढील निर्णय घेण्यात यावा. भविष्यात होणा-या जनआंदोलनाल ही कंपनी, पर्यावरण सल्लागार व प्रशासन जबाबदार राहिल.

१८) **<u>एडव्होकेट रामदास पाटील, राहणार-टाकली, खालापूर, जिल्हा - रायगडः-</u>**

त्यांनी मत मांडले की प्रशासनाने जनतेचा मोठा आक्रोश ऐकलेला आहे. कारण हा प्रकल्प धोकादायक आहे. उपस्थितांनी सर्वांनीच प्रकल्पास विरोध केलेला आहे. अशा कारखान्यामुळे कोर्टात केसेस होतात व स्थानीक व कंपनीत तणावाचे संबंध राहतात. तर सदरहू कारखाना येथे आत्करगावात येऊ नये. जेथे लोकवस्ती नाही अशा ठिकाणी कारखाना न्यावा, येथे सुरु करण्याचा आग्रह करु नये.

श्री खवले यांनी येथे सांगितले की गावात मयत झालेली असूनही येथे एवढे लोक आलेले आहेत यांची नोंद घेण्यात यावी.

१९) **श्री दिलिप पुंडलीक पाटील,**
**म.न.से.तालुका उपाध्यक्ष, राहणार-आत्करगाव,**
**तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

आमच्या गावात तरुण मुलाची मयत झालेली आहे. तरी एवढे लोक जमलेले आहेत. हा प्रकल्प हानीकारक आहे, तो येथे नको हे सांगण्यास एवढे लोक आलेले आहेत. तरी प्रकल्प या गावात येऊ नये.

२०) **मिस रेश्मा आंग्रे,**
**खालापूर तालुका संघटक,शिवसेनाः-**

अहवाल हा ३६५ दिवसांचा दिलेला नाही. पर्यावरण सल्लागार हे उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. अहवाल हा मराठीत दिलेला नाही. प्रत्येकाच्या जीवाचा प्रश्न आहे. येथे बरेच प्रदूषण आहे. शिवाय ही कंपनी प्रदूषण करणार आहे. प्रकल्प स्थानाजवळ दाट लोकवस्ती आहे. तरी प्रकल्पास मुंबई येथे पर्यायी जागा निवडण्यात यावी. त्याच्या अगोदर या कारखान्यास येथे येण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

२१) **श्री राजेश पाटील, राहणार-अतरगाव,**
**तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी विनंती केली की त्यांना दोन मिनिटांची क्लिप दाखवायची आहे. या एसएमएस प्रकल्पाबाबत प्रसिध्द फिल्म अभिनेता अक्षयकुमार यांनी गोवंडी प्रकल्पाबाबत जे वक्तव्य केलेले आहे त्याची व्हिडीयो क्लिप दाखवायची आहे त्यास अध्यक्षांनी परवानगी दिली. त्यात अक्षयकुमार

असे म्हणतात की सरासरी सर्वसाधारण माणसाचे आयुष्य हे ६७ वर्षांचे आहे, तर गोवंडीतील माणसाचे सरासरी आयुष्यमान हे फक्त ३९ वर्षांचे आहे.

२२) **<u>श्री निलेश गणपत पाटील, राहणार-साजगाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

त्यांनी सांगितले की पूर्वीपासून  हा प्रकल्प गोवंडीत कार्यरत आहे. गोवंडीतील लोकसंख्या जास्त असेल, तर येथील पाच ग्रामपंचायतीची लोकसंख्या ही १५,००० ते २०,००० पर्यत जाईल. तेथे जीव आहेत, तर येथेही जीव आहेत. त्या जीवांना वाचविण्यासाठी या जीवाला मारू नका. कोरोनाच्या महामारी संकटानंतर सर्व देशांनी लॉकडाऊन घोषित केला. आपल्या देशातही प्रत्येक राज्यांना वेगवेगळ्या पध्तीने लॉकडाऊन घोषित केला.  महाराष्ट्रात जिल्ह्यानिहाय लॉकडाऊन केला. त्याचप्रमाणे मुंबईचा कचरा येथे आणणार हे कसे मान्य होईल.

व्हिडीओ ऐकल्यानंतर श्री राजेश पाटील यांनी सांगितले की कंपनी खोटी माहिती देते की गोवंडीला जागा नाही, म्हणून येथे येत आहे. तेथून या कंपनीला हाकलेले आहे.

अध्यक्षांनी श्री पाटील यांना सांगितले की आपण व्हिडिओ जिल्ह्याचे पालक मंत्री, गावातील ग्रुप यांना पाठवावीत. आम्ही लोकशाही पध्दतीने सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले असून सर्वांच्या मुदद्यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदस्य, आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

अध्यक्षा यांच्या परवानगीने, सदस्य, आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सर्व प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, स्थानिक शेतकरी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानले व माननीय अध्यक्षांच्या वतीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या लेखी सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे सूचना केली. सदर जनसूनावणीस कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून सदरील प्रस्तावित प्रकल्पास उपस्थित असलेल्या सर्व ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे, लोकप्रतिनिधींचे तसेच विविध संघटनांचा प्रचंड विरोध निदर्शनास आला. यावरुन असे दिसते कि सदर प्रकल्पास परवानगी दिल्यास परीसरामध्ये तीव्र जनआक्रोश होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

जनसुनावणी दिवशी प्राप्त झालेली निवेदन तसेच सुनावणी अगोदर प्राप्त झालेले आक्षेप सोबत जोडलेली आहेत.

**(विद्यासागर किल्लेदार)**
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिति
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड

**(डॉ. पद्मश्री बैनाडे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिति
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा-रायगड